विशेष दिवाणी दावा क्र.७०/१९९०
सुलोचनादेवी व इतर वि. दुर्गादेवी व इतर
CNR-MHJNO20000171990

## निशाणी क्र.२४५ वरील आदेश

प्रस्तुतच्या अर्जात मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मुळ वादी यांनी मुळ दावा निशाणी क्र.१ मध्ये दुरुस्ती करुन दुरुस्ती दावा दाखल करण्याबाबत निर्देश देणेसाठी प्रतिवादीतर्फे अर्ज दाखल केलेला आहे.

२) प्रतिवादींनी कथन केले आहे की, प्रस्तुत प्रकरणात मा. उच्च न्यायालय यांच्या आदेशानुसार वादी यांनी मुळ दावा निशाणी क्र.१ मध्ये दुरुस्ती करुन परिच्छेद क्र.८-अ वगळून सुधारीत दावा दाखल करणे आवश्यक असताना वादींनी वेगवेगळया दुरुस्ती अर्जात दुरुस्ती केली असून मुळ दावा निशाणी क.१ मध्ये आदेशित दुरुस्ती केली नाही. त्यामुळे सदर बाबींची पुर्तता करुन दुरुस्ती दाव्याची सुधारीत प्रत दाखल करुन प्रकरण लवकरात लवकर चालवावे अशी त्यांनी विनंती केली आहे.

३) वादीतर्फे प्रस्तुतच्या अर्जाला म्हणणे निशाणी क्र.२४६ दाखल केले आहे. वादींनी कथन केले आहे की, तत्तकालीन दिवाणी न्यायाधीश (व. स्तर), यांच्या निशाणी क्र.२११ वरील आदेशानुसार वादींनी दाव्यात दुरुस्ती करुन परिच्छेद क्र.८-अ मधील उपपरिच्छेद नमुद केला आहे. सदर आदेशाविरुध्द प्रतिवादींनी मा. उच्च न्यायालयात प्रकरण दाखल केले होते. त्यामधील आदेशानुसार परिच्छेद क्र.८-अ मधील उपपरिच्छेद वगळण्याबाबत आदेशित केले आहे. त्यामुळे संपूर्ण परिच्छेद ८-अ वगळण्याची आवश्यकता नाही. तसेच, वादींनी मुळ दाव्यामध्येच सुधारणा करावी असा कोणताही कायदा नाही. न्यायालयाने आदेशित केल्यास वादी मुळ निशाणी क्र.१ मधील सुधारणा करण्यास तयार आहे. त्यामुळे वादींचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी त्यांनी विंनती केली.

४) दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाची पडताळणी केली असता, वादीतर्फे

दाखल केलेला अर्ज निशाणी क्र.१४५ वरील दिनांक १८.१०.१९९९ रोजीच्या आदेशानुसार वादींनी मुळ दाव्यात परिच्छेद ८–अ समाविष्ट केला व त्यानंतर निशाणी क्र.२११ वरील आदेशानुसार सदर परिच्छेद ८–अ मधील उपपरिच्छेद मधील मजकुर " That, on 11.4.1996 Pandurang s/o Jagannath Taluka and his wife Smt. Durgadevi w/o Pandurang Agrawal executed a Kararnama in favour of plaintiffs and delivered some portion of the suit premises in possession of the plaintiffs stated in the said Kararnama. Since then plaintiffs are in possession of compound of Natraj Talkies in which a shop where Novelty type writing Institute is situated and a canteen and open space admeasuring 38 x 17 Mtrs. Has been given in possession of plaintiffs by Pandurang and Durgadevi and since then plaintiffs are in possession of the said premises. Moreover, Smt. Durgadevi executed the said Kararnama for herself and as a guardian for her son namely Shriram and Shailendra. The xerox copy of the same is already filed at Ex.88 and 89." हा मजकुर समाविष्ट केला.

५) सदर निशाणी क्र.२११ वरील आदेशाविरुध्द प्रतिवादींनी मा. उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र.२४१२/२००५ द्वारे आव्हानित केले. मा. उच्च न्यायालय यांनी दिनांक २०.०२.२०२० च्या आदेशान्वे तत्कालीन दिवाणी न्यायाधीश व.स्तर, जालना यांनी निशाणी क्र.२११ वर पारीत केलेला आदेश रद्द करण्यात आला. एकंदरीत, निशाणी क्र.१४५, २११ व मा. उच्च न्यायालय यांचे दिनांक २०.०२.२०२० रोजीच्या आदेशावरुन असे निर्दशनास येते की, संपूर्ण परिच्छेद ८–अ वगळण्याची आवश्यकता नसून वादींतर्फे दाव्यात निशाणी क्र.२११ वर आदेशान्वये समाविष्ट करण्यात आलेला परिच्छेद क्र.८–अ मधील उपरोक्त नमुद मजकुर दाव्यात वगळणे आवश्यक आहे. वादींतर्फे निशाणी क्र.२११ संबंधीत मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दाव्यात दुरुस्ती करत असताना दुरुस्ती दावा निशाणी क्र.२१५ मध्ये परिच्छेद क्र.८–अ मधील उपरोक्त नमुद अतिरिक्त मजकूर दिनांक ०९.११.२०२० रोजी वगळण्यात आला व त्याप्रमाणे दुरुस्ती दावा निशाणी क्र.२४३ वर दाखल करण्यात आला. त्यामुळे वादींतर्फे सदर दुरुस्ती ही मा.

उच्च न्यायालय यांच्या आदेशान्वये बरोबर करण्यात आल्याचे दिसुन येते.

६) वर उल्लेख केल्याप्रमाणे मा. उच्च न्यायालय यांनी निशाणी क्र.२११ अन्वये दाव्यात करण्यात आलेली सुधारणा रद्द करण्यात येते असे म्हटले असल्यामुळे वादींनी सदर आदेशानुसारच दुरुस्ती करुन दुरुस्ती दावा दाखल केल्याचे दिसुन येत असल्याने प्रस्तुतचा अर्ज स्वीकार्य नसल्याचे आढळते. परंतु दाव्यात करण्यात आलेल्या सुधारणा या मुळ दाव्यात न करताच सुधारीत दाव्यामध्ये करण्यात आले आहे. त्यामुळे प्रकरण चालविण्यास अडचणी येवू नये व भविष्यातील गुंतागुंत टाळण्यासाठी वादींनी सुधारणा मुळ दाव्यात सुध्दा करण्यात यावी असा आदेश पारीत करणे उचीत ठरेल.

**आदेश**

१) अर्ज रुपये ३००/– खर्चासह नामंजुर करण्यात येतो.

२) वादींनी सुधारीत दाव्यात केलेल्या सुधारणा मुळ दाव्यात सुध्दा कराव्यात असा निर्देश पारीत करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Madhuri Sudhakar Kulkarni
Date: 2021.01.25 14:10:31 +0530

(एम. एस. कुलकर्णी)

दिनांक २२.०१.२०२१

दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),
जालना

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्रा प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : एम. डी. आढे

न्यायालयाचे नाव : दिवाणी न्यायालय (व. स्तर), जालना

दिनांक : २५.०१.२०२१

सही/-

एम. डी. आढे

लघुलेखक (नि. श्रे.)